तरुण भारत
सातारा
www.tarunbharat.com
₹ ५.०० मंगळवार दि. ८ जानेवारी २०१९ बेळगाव • गोवा •

डी. पी. भोसले कॉलेज ग्रंथालय कोरेगांव

# आविष्कार संशोधन स्पर्धेत 'डी. पी. भोसले' चे यश



**कोरेगाव : आविष्कार संशोधन स्पर्धेत यश मिळविलेल्या शाहिन इनामदार, सिमरन इनामदार, शुभम लवळे, अभिजीत बर्गे यांच्यासमवेत मार्गदर्शक डॉ. एन. डी. निकम.**

वार्ताहर
एकंबे

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर येथे झालेल्या मध्यवर्ती आविष्कार संशोधन स्पर्धेत डी. पी. भोसले कॉलेजच्या शाहिन इनामदार व सिमरन इनामदार या विद्यार्थिनींनी उज्वल यश संपादन केले असून गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली येथे होणाऱ्या राज्यस्तरीय स्पर्धेसाठी त्यांची निवड झालेली आहे. अनेक ठिकाणी झालेल्या विविध स्पर्धांमध्ये महाविद्यालयाने उज्ज्वल असे घवघवीत यश संपादन केले आहे.

पदवी गटातून शाहिन इनामदार हिने वैधक व औषधशास्त्र विभागातून द्वितीय तर सिमरन इनामदार हिने मानव्यशास्त्र विभागातून तृतीय क्रमांकाचे यश मिळविले. सातारा येथील वाय. सी. कॉलेजमध्ये झालेल्या जिल्हास्तरीय आविष्कार संशोधन स्पर्धेत पाच विभागात डी. पी. भोसले कॉलेजने घवघवीत यश संपादन केले. पदवी गटात मानव्यशास्त्र विभागातून सिमरन इनामदार हिने प्रथम, शेती आणि पशू संवर्धन विभागात शुभम लवळे याने प्रथम, अभियांत्रिकी व तंत्रज्ञान विभागात अभिजीत बर्गे याने द्वितीय, वैधक व औषधशास्त्र विभागात शाहिन इनामदार हिने द्वितीय तर मुलभूत विज्ञान विभागात स्नेहल घाडगे हिने तृतीय क्रमांकाचे यश प्राप्त केले.

कराड येथे संपन्न झालेल्या राज्यस्तरीय रयत आविष्कार संशोधन स्पर्धेत शिक्षक गटात प्रा. डी. डी. पाटील यांनी वाणिज्य व्यवस्थापन व कायदा या विभागातून द्वितीय क्रमांक तर पदवी गटात प्रियांका प्रभुने हिने वैधक आणि औषधशास्त्र विभागातून उत्तेजनार्थ क्रमांकाचे यश मिळविले. शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर येथे झालेल्या विद्यापीठस्तरीय आविष्कार संशोधन स्पर्धेत शिक्षक गटात प्राध्यापक पोपट माने यांनी तृतीय व महेजबीन बागवान यांनी अभियांत्रिकी व तंत्रज्ञान विभागातून तृतीय तर पदव्युतर गटात ओंकार बर्गे या विद्यार्थ्याने मानव्यशास्त्र विभागातून तृतीय क्रमांकाचे यश संपादन केले.

**गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली येथे होणाऱ्या स्पर्धेसाठी निवड**

यशस्वी विद्यार्थ्यांना प्रा. डॉ. एन. डी. निकम, प्रा. डॉ. भी. एस. लोकडे, प्रा. डॉ. भी. एस. चव्हाण, प्रा. डॉ. व्ही. व्ही. नावडकर व समन्वयक प्रा. डॉ. व्ही. एस. जमदाडे यांचे मार्गदर्शन मिळाले.